क्रमांक : मुंमप्रविप्रा/बैठक/६६

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
वांद्रे-कुर्ला समूह, प्लॉट क्र. सी-१४ व १५,
वांद्रे [पूर्व], मुंबई- ४०० ०५१.

दिनांक : ५ नोव्हेंबर, १९९२

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक १ ऑक्टोबर, १९९२ रोजी झालेल्या ६६ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठविली आहे.

२. सन्माननीय सदस्यांनी या बाबतीत काही हरकती असल्यास त्या कृपया कळवाव्यात ही विनंती.

[श्र. वि. आसगांवकर]
सचिव,
कार्यकारी समिती

प्रति,
सर्व सदस्य

निमंत्रित :

शासनाचे सचिव [२]
नगर विकास विभाग
मंत्रालय.

प्रत अग्रेषित :
विधी सल्लागार, मुं.म.प्र.वि.प्रा.
प्राधिकरणाचे अधिकारी

No. BMRDA/MTG/66.

BOMBAY METROPOLITAN REGION
DEVELOPMENT AUTHORITY,
Plot Nos. C-14 & C-15,
Bandra-Kurla Complex,
Bandra (East),
BOMBAY - 400 051.

Date : 5th November, 1992.

The minutes of the 66th meeting of the Bombay Metropolitan Region Development Authority held on the 1st October, 1992 are enclosed.

Members are requested kindly to intimate their objections, if any.

Sd/-

( S. V. ASGAONKAR )
SECRETARY,
EXECUTIVE COMMITTEE.

To :

All Members.

INVITEE :

The Secretary (II) to the Government of Maharashtra, Urban Development Department, Mantralaya.

Copy to :-

The Legal Adviser, B.M.R.D.A.

The Officers of the B.M.R.D.A.

-.-.-.-.-.-.-.-

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या ६६व्या बैठकीचे कार्यवृत्त

दिनांक : १ ऑक्टोबर, १९९२ [गुरुवार]

वेळ : सकाळी ११-०० वाजता

सभास्थान : मा. नगर विकास मंत्री यांच्या कार्यालयातील समिती कक्ष [खो. क्र. ३१३] तिसरा मजला, मंत्रालय.

उपस्थित सदस्य :

| | | |
|---|---|---|
| श्री. वसंत चव्हाण, नगर विकास मंत्री | - | अध्यक्ष |
| प्रा. जावेद खान, गृहनिर्माण मंत्री | - | सदस्य |
| श्री. रा. ता. कदम, अध्यक्ष, स्थायी समिती, बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री. सुभाष मयेकर, नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री. चंद्रकांत वा. गोसालिया, विधानसभा सदस्य | - | सदस्य |
| श्री. प्रभाकर ना. धारकर विधान परिषद सदस्य | - | सदस्य |
| श्री. डी. टी. जोसेफ, शासनाचे सचिव [१], नगर विकास विभाग | - | सदस्य |
| श्री. नवीन कुमार, शासनाचे सचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग | - | सदस्य |
| श्री. आर. सी. सिन्हा, व्यवस्थापकीय संचालक, सिडको | - | सदस्य |
| श्री. पी. सुब्रह्मण्यम, महानगर आयुक्त | - | सदस्य-सचिव |

बाब क्र. १ : प्राधिकरणाच्या मागील [६५व्या] बैठकीचे कार्यवृत्त पक्के करणे.

कार्यवृत्त पक्के करण्यात आले.

[कृ. मा. प.]

बाब क्र. २ : प्राधिकरणाच्या मागील [६५व्या] बैठकीच्या कार्यवृत्तावर केलेली कार्यवाही.

२.१ शासनाचा नगर विकास विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि जमीनधारक मेसर्स मुकुंद आयर्न ॲण्ड स्टील वर्क्स लि. [आता मुकुंद लिमिटेड म्हणून पुनर्नामित] यांच्यामध्ये त्रिपक्षीय करार करण्याच्या प्रश्नावर पुन्हा चर्चा करण्यात आली. नागरी जमीन कमाल मर्यादा विषयीच्या सचिव समितीने, नगर विकास विभाग तसेच गृहनिर्माण विभाग यांची निवेदने विचारात घेऊन, मे. मुकुंद यांच्या पवई येथील जागेच्या परिसरातील शर्मा-वर्मा कुटूंबाकडील जमिनीबाबत अशाच त्रिपक्षीय करारात लागू केलेल्या शर्तीवर प्रस्तावित त्रिपक्षीय करार करण्याचा निर्णय घेतला याची नोंद घेण्यात आली. चर्चेअंती असे ठरविण्यात आले की, ११ ऑगस्ट, १९९२ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या ६५व्या बैठकीत नेमलेल्या अभ्यास गटाच्या अहवालाची वाट न पाहता हा प्रश्न पुन्हा प्राधिकरणाच्या पुढील बैठकीपुढे आणावा आणि प्राधिकरणाने याबाबत फेरविचार करून अंतिम निर्णय घ्यावा.

२.२ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेशी करावयाच्या कराराच्या संबंधात, [प्राधिकरणाच्या ६५व्या बैठकीतील बाब क्र. ४] महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेने सुचवल्याप्रमाणे प्रारूप कराराच्या परिच्छेद २ मध्ये करावयाचे फेरबदल प्राधिकरणाने स्वीकारण्याचे मान्य केले.

त्यानंतर प्राधिकरणाने, कार्यवृत्तावरील कार्यवाहीच्या अहवालाची नोंद घेतली.

बाब क्र. ३ : भारत नगर व वाल्मिकी नगर झोपडपट्टयांतील रहिवाशांसाठी सार्वजनिक शौचालये बांधण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेला ब्लॉक "जीएन"मधील जमीन नेमून देणे.

३.१ ही बाब चर्चिली जात असताना असे सुचविण्यात आले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला संदर्भाधीन जमिनीवर सुलभ पध्दतीची सार्वजनिक शौचालये बांधावी व आवश्यक असल्यास या प्रयोजनासाठी ३०० चौ. मी. पर्यंत जमीन उपलब्ध करून द्यावी अशा प्रकारे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने बांधलेली शौचालये नंतर बृहन्मुंबई महानगर-

...३/-

पालिकेच्या स्वाधीन करावी आणि इतर झोपडपट्टयातील सार्वजनिक शौचालयांच्या धर्तीवर मुंबई महानगरपालिकेने या शौचालयांची देखभाल करावी. ही सूचना मान्य करण्यात आली आणि पुढील ठराव मंजूर करण्यात आला :-

ठराव क्र. ५३० :

"असा ठराव करण्यात येत आहे की, [१] मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ३ चे पोटकलम [२] अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व शक्तींचा वापर करून प्राधिकरण याद्वारे, वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जीएन" ब्लॉकमधील ३०० चौ. मीटर जमीन, त्यावर स्त्री व पुरूषांसाठी सुलभ पध्दतीची सार्वजनिक शौचालये बांधून झाल्यानंतर प्रतिवर्ष रु. १/- या नाममात्र भाडयाने ८०वर्षांच्या भाडेपट्टयाने बृहन्मुंबई महानगरपालिकेस नेमून देण्यास महानगर आयुक्तास प्राधिकृत करीत आहे आणि [२] उपरोक्त सार्वजनिक शौचालयांच्या बांधकामासाठी लागणारा खर्च मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या निधीतून करण्यास देखील महानगर आयुक्तास प्राधिकृत करीत आहे.

"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या भूमि अधिका-यास, या संबंधात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रतिनिधी बरोबर, प्रस्तावित केल्याप्रमाणे, आवश्यक फेरबदलांसह नमूना "डी" व नमूना "ई"मधील करारपत्र करून देण्यास याद्वारे प्राधिकृत करीत आहे."

बाब क्र. ४ : इन्फ्रास्ट्रक्चर लिझींग अँण्ड फायनानशियल सर्व्हीसेस लि. [आयएल अँण्ड एफएस] यांना वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकमधील जमीन नेमून देणे — अधिमूल्य प्रदानाची पध्दती.

या प्रस्तावावर चर्चा झाली आणि चर्चेच्या शेवटी असे ठरविण्यात आले की, आयएल अँण्ड एफएस यांना भाडे अधिमूल्य भरण्याच्या बाबतीत खाली नमूद केल्याप्रमाणे सवलत देण्यात यावी :-

अ] देकार स्वीकारल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत भाडे अधिमूल्याच्या ४० टक्के पहिला हप्ता म्हणून

ब] देकार स्वीकारल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत एकूण भाडे अधिमूल्याच्या ३५ टक्के दुसरा हप्ता म्हणून व

क] वरील [ब] मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रदानाच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत एकूण भाडे अधिमूल्याची उरलेली २५ टक्के रक्कम तिसरा हप्ता म्हणून घ्यावी.

प्राधिकरणाने तदनुसार पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ५३१ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे पोटकलम [२] अन्वये प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण [जमिनीची विल्हेवाट] विनियम १९७७ चा विनियम क्र. ६ शिथिल करून आणि या बाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व शक्तींचा वापर करून, तसेच २१एप्रिल, १९९२ रोजीच्या आपल्या ६३व्या बैठकीत मंजूर केलेल्या ठराव क्र. ५०७ मध्ये फेरबदल करून प्राधिकरण याद्वारे आयएल ॲण्ड एफएसला रु.४२ कोटींचे भाडे अधिमूल्य खाली नमूद केल्याप्रमाणे प्रदान करण्यास परवानगी देत आहे :-

अ] देकार स्वीकारल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत भाडे अधिमूल्याचे ४० टक्के पहिला हप्ता म्हणून

ब] देकार स्वीकारल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत एकूण भाडे अधिमूल्याच्या ३५ टक्के दुसरा हप्ता म्हणून

क] वरील [ब] मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रदानाच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत एकूण भाडे अधिमूल्याची उरलेली २५ टक्के रक्कम तिसरा हप्ता म्हणून घ्यावी.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, "डी" नमुन्यातील भाडेपट्टयाच्या करारात आणि नमूना "ई" मधील भाडेपट्टा विलेखात, प्रस्तावित केल्याप्रमाणे आवश्यक ते बदल करण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र. ५ : वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकमधील ५००० चौ.मी. जमीन अधिकारयुक्त हिशेब तपासणीसाच्या [Chartered Accountant] संघटनेची कार्यालयीन इमारत बांधण्यासाठी नेमून देणे.

या बाबीवर विचारविमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

...५/-

बाब क्र. ६ : वांद्रे-कुर्ला संकुल अधिसूचित क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडील १९९१-९२ या वर्षाचा वार्षिक अहवाल.

या बाबीवर चर्चा चालू असताना असे सुचवण्यात आले की, मिठी नदी व वाकोला नाला यांच्या मार्गीकरणाचा तपशील सद्यस्थिती अहवालासहीत प्राधिकरणाच्या विचारार्थ स्वतंत्र बाब म्हणून मांडण्यात यावा. हे मान्य करण्यात आले. त्यानंतर प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्रमांक ५३२ :

"असा ठराव संमत करण्यात येत आहे की, [१] महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम १३३ नुसार वांद्रे कुर्ला अधिसूचित क्षेत्राकरिता विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने १९९१-९२ या वर्षात केलेल्या कार्याच्या अहवालास प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे. आणि [२] सदर अहवाल शासनाला सादर करण्याचे अधिकार महानगर आयुक्तांना देत आहे."

बाब क्र. ७ : कल्याण संकुल अधिसूचित क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा १९९१-९२ या वार्षिक अहवाल.

प्राधिकरणाने वार्षिक अहवाल संमत केला व पुढील ठराव मंजूर केला :

ठराव क्र. ५३३ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरण [१] मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून कल्याण संकुल अधिसूचित क्षेत्राचा १९९१-९२ च्या प्रारूप अहवालास मंजूरी देत आहे, आणि [२] सदर अहवाल राज्य शासनास सादर करण्याचे अधिकार महानगर आयुक्तांना देत आहे."

बाब क्र. ८ : बॅक-बे पुनःप्रापण योजनेकरिता [ब्लॉक तीन ते सहा] मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून १९९१-९२ चा वार्षिक अहवाल.

प्राधिकरणाने वार्षिक अहवाल संमत केला व पुढील ठराव मंजूर केला:

ठराव क्र. ५३४ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, [१] बॅकबे पुनःप्रापण योजनेतील

ब्लॉक तीन ते सहाकरिता विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केलेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १९९१-९२ सालाच्या प्रारूप वार्षिक अहवालास प्राधिकरण मान्यता देत आहे, आणि [२] सदर अहवाल राज्य शासनाला सादर करण्याचे अधिकार महानगर आयुक्तांना देण्यात येत आहे."

बाब क्र. ९ : विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा ओशिवरा जिल्हा केंद्रासाठी १९९१-९२ या कालावधीचा वार्षिक अहवाल.

प्राधिकरणाने वार्षिक अहवाल संमत केला व पुढील ठराव मंजूर केला :

ठराव क्रमांक ५३५ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरण [१] ओशिवरा जिल्हा केंद्राकरिता विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने तयार केलेल्या १९९१-९२ प्रारूप अहवालास मंजूरी देत आहे आणि [२] सदर अहवाल राज्य शासनाकडे सादर करण्याचा अधिकार महानगर आयुक्तांना देत आहे."

बाब क्र. १० : घाऊक लोखंड व पोलाद बाजार कळंबोली, नवी मुंबई येथे हलविणे -- आलेल्या अडचणी

या बाबीवर चर्चा चालू असताना, असे लक्षात आले की आवश्यक असलेल्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. परंतु बहुसंख्य व्यापारी जाण्यास विलंब करीत असल्यामुळे या सुविधा चालू ठेवणे फार कठीण झाले आहे. हेही लक्षात आले आहे की जे थोडे व्यापारी यापूर्वी कळंबोलीस गेले तेथे त्यांना धंदा करणे फार कठीण जात आहे. सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकांनी असे स्पष्ट केले आहे की एकदा व्यापारी कळंबोलीला गेल्यानंतर त्यांच्या समस्यांचा नियतकालिक बैठकी घेऊन विचार केला जाईल.

त्यानंतर १ डिसेंबर १९९२ पर्यंत व्यापाऱ्यांना तेथे जाण्याबाबत अंतिम नोटीसा द्याव्यात असे ठरविण्यात आले.

बाब क्र. ११ : वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" व "जीएन" ब्लॉकमधील जमिनी नेमून देण्याची कार्यपध्दती भाडे अधिमूल्य निर्धारण

चर्चेनंतर, असे ठरविण्यात आले की, वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जीएन" फक्त २ निवासी भूखंड, केंद्र व राज्य सरकार, निमसरकारी संस्था

...७/-

व सार्वजनिक क्षेत्र उपक्रमांकडून जाहिरातीद्वारे देकार मागवून विकण्यात यावेत.

बाब क्र. १२ : लीलावती किर्तीलाल मेहता मेडिकल ट्रस्टकरिता वांद्रे-कुर्ला संकूल, "ए" ब्लॉक, वांद्रे रेक्लमेशन, वांद्रे [पश्चिम] येथील सीटीएस क्र. ए-७९१ जमिनीवर प्रस्तावित रुग्णालय इमारतीकरिता अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांक ०.५ देणे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १५४ अन्वये वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "ए" ब्लॉकमध्ये वांद्रे रेक्लमेशन, वांद्रे [पश्चिम] येथे सीटीएस क्र. ए-७९१ या जमिनीवर लीलावती किर्तीलाल मेहता मेडिकल ट्रस्टच्या रुग्णालय इमारतीच्या विस्ताराकरिता सध्याच्या २.५ चटई क्षेत्र निर्देशांकाच्यावर ०.५ अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक उपलब्ध करून देण्याविषयीच्या शासनाच्या आदेशाचा प्राधिकरणाने विचार केला आणि नेहमीचा चटईक्षेत्र निर्देशांक १.५ आणि मे. लीलावती किर्तीलाल मेहता मेडिकल ट्रस्टला रुग्णालयांकरिता शासनाने आधीच मंजूर केलेला अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांक १.० यांच्यावर ०.५ जास्तीचा चटईक्षेत्र निर्देशांक देण्याचे प्राधिकरणाने ठरविले.

बाब क्र. १३ : शिकाऊ उमेदवार [सुधारणा] अधिनियम, १९७३ अन्वये स्थापत्य अभियांत्रिकीमधील [स्नातक/पदविकाधारक] शिकाऊ उमेदवारांची ६ पदे निर्माण करणे...

प्राधिकरणाने विषय टिप्पणीतील प्रस्ताव संमत केला व पुढील ठराव मंजूर केला.

ठराव क्र. ५३६ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ११ पोटकलम [२] अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून प्राधिकरण, महाराष्ट्र शासनाच्या मान्यतेस अधीन राहून, याद्वारे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अभियांत्रिकी विभागाच्या आस्थापनेवर स्थापत्य अभियांत्रिकीमधील [स्नातक/पदविकाधारक] शिकाऊ उमेदवारांची ६ पदे शासन वेळोवेळी ठरविल त्या नियत वृत्तिवेतनावर निर्माण करण्यास मंजूरी देत आहे."

बाब क्र. १४ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणात रु. ३०००-४५०० [सुधारीत] या वेतनश्रेणीत सहाय्यक विधी सल्लागाराचे एक पद निर्माण करणे.

सहाय्यक विधी सल्लागाराचे पद निर्माण करण्याचा प्रस्ताव मंजूर

करताना प्राधिकरणाने अशी सूचना केली की बाब टिप्पणीच्या जोडपत्रात उल्लेखिलेला नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नेमणूकीचा अनुभव हा १० वर्षांऐवजी ५ वर्षे असावा.

तदनुसार प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :

ठराव क्र. ५३७ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ११[२] अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा व याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून प्राधिकरण याद्वारे, कायदेविषयक कामकाज पहाण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या प्रशासन विभागाच्या आस्थापनेवर रू. ३०००-४५०० [सुधारीत] या वेतनश्रेणीत सहाय्यक विधी सल्लागाराचे एक पद, प्रस्तावित केल्याप्रमाणे, राज्य शासनाच्या मान्यतेस अधीन राहून, निर्माण करण्यास मंजूरी देत आहे."

बाब क्र. १५ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण बांधत असलेल्या चार इमारतीतील बांधून झालेल्या जागेच्या वितरणासंबंधी महानगर आयुक्तांनी घेतलेले निर्णय -- त्यांचा अहवाल

वडाळा येथील ट्रक टर्मिनलजवळ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण बांधत असलेल्या चार इमारतींतील बांधून झालेल्या अतिरिक्त जागेच्या वितरणा-संबंधी महानगर आयुक्तांनी घेतलेले निर्णय ज्याना ११ ऑगस्ट, १९९२ च्या प्राधिकरणाच्या ठराव क्र. ५२४ अन्वये प्राधिकरणाच्या अध्यक्षांनी अगोदरच मान्यता दिलेली होती त्यांची प्राधिकरणाने नोंद घेतली.

बाब क्र. १६ : वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकमध्ये आणि वडाळा भारवाहक तळ येथे वीजग्रहण केंद्र व उपकेंद्रासाठी जमिनीचे वितरण करण्याचे अधिकार महानगर आयुक्तांना देणे.

प्राधिकरणाने बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य केला आणि पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ५३८ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे पोटकलम [२] अन्वये प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून आणि जमिन वितरण विनियम १९७७ चे विनियम क्र. ४ शिथिल करून प्राधिकरण याद्वारे महानगर आयुक्तांकडे, पुढील

...९/-

शर्तींच्या अधीन राहून जमिनीच्या वितरणाबाबतचे आपले अधिकार सोपवीत आहे :-

[१] बेस्ट, बीएसईएस आणि टाटा इलेक्ट्रीक सप्लाय कंपनी, यांना महानगर आयुक्तास योग्य वाटेल त्याच दरांनी आणि त्यास प्राधिकरणाच्या अध्यक्षांच्या पूर्वमान्यतेच्या शर्तीवर प्राधिकरणाची जमीन वीजग्रहण केंद्रे व उपकेंद्रे आणि टावर्स उभारण्यासाठी नेमून देताना महानगर आयुक्त या अधिकाराचा वापर करतील, आणि

[२] अशा प्रकारचे घेतलेले निर्णय कार्योत्तर मंजूरीसाठी प्राधिकरणाच्या पुढील बैठकींमध्ये प्राधिकरणापुढे ठेवण्यात येतील."

<u>बाब क्र. १७</u> : <u>वडाळा भारवाहक तळ टप्पा-१ मध्ये पेट्रोल व डिझेल पंप आणि सर्विस स्टेशनसाठी राखून ठेवलेल्या २ भूखंडांचे वितरण</u>

प्राधिकरणाने बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करून पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. ५३९ :</u>

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे पोटकलम [२] आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण [जमिनीचे वितरण] विनियम, १९७७ या विनियम क्र. ४ [तीन] यान्वये प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून प्राधिकरण याद्वारे ३५० चौ. मीटर अनुज्ञेय बांधीव क्षेत्रासह ११४७ चौ. मीटरचा भूखंड इंडियन ऑईल कॉर्पोरेशनला बांधणीयोग्य क्षेत्राच्या प्रति चौ. मीटरला रु. ५,०००/- [रुपये पाच हजार फक्त] या भाडे अधिमूल्याच्या दराने देऊ करण्यास पुढील अटी व शर्तींवर मान्यता देत आहे :-

१. देकार स्वीकारण्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत इंडियन ऑईल कॉर्पोरेशन भाडे अधिमूल्याची अर्धी रक्कम देईल आणि उरलेली रक्कम, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण [जमिनीचे वितरण] विनियम, १९७७ च्या विनियम ९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे त्यानंतर तीन महिन्यांच्या आत देईल,

२. ह्या भूखंडाकरिता प्राधिकरणाकडून आकारण्यात येईल अशा दराप्रमाणे दर १० वर्षांनी भाडेमूल्यात सुधारणा केली जाईल,

३. भाडेपट्टयाचा कालावधी ३० वर्षांचा राहील.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, इंडो-बर्मा पेट्रोलियम कं. लि. यांना पेट्रोल व डिझेल पंप आणि सर्विस स्टेशन यासाठी टप्पा-१ मध्ये राखून ठेवलेला १४८० चौ. मी. चा भूखंड ३५० चौ. मी. बांधणीयोग्य क्षेत्रासह नेमून देण्यास प्राधिकरण याद्वारे तत्वत: मान्यता देत आहे. इंडियन ऑईल कॉर्पोरेशनला

[कृ. मा. प.]

११४७ चौ.मी.भूखंड ज्या अटींवर व शर्तींवर नेमून देण्यात आला त्या अटी व शर्ती इंडो-बर्मा पेट्रोलियम कंपनीला देऊ केलेल्या भूखंडाला लागू होतील आणि तसेच वडाळा येथील सीएस क्र.७ मधील जमिनीबाबत शासनाच्या महसूल व वन विभागाकडून स्पष्ट आदेश देण्यात येतील तेव्हा आणि प्रस्तावित केल्याप्रमाणे प्राधिकरणाच्या अध्यक्षांची मान्यता मिळाल्यानंतर, उक्त भूखंड आयबीपीला देऊ करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, हा ठराव कार्यान्वित करण्यास आणि नमुना "डी" मधील भाडेपट्टा करारात आणि नमुना "इ" मधील भाडेपट्टा विलेखात आवश्यक ते फेरबदल करण्यास महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र.१८ : धाबा व शयनशाळा, कार्यशाळा व सुटे भाग आणि वाहनकाटा, माल मोटारी धुण्याची जागा इ.साठी राखून ठेवलेल्या भूखंडाचे वितरण महानगर आयुक्तांकडे सोपवावयाचे अधिकार

प्राधिकरणाने विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करून पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.५४० :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ च्या कलम ३च्या पोटकलम [२] अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि या बाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून प्राधिकरण याद्वारे, त्यास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण [जमिनीचे वितरण] विनियमांच्या विनियम ३ व ४ अन्वये, बाब टिप्पणीच्या परिच्छेद २ मध्ये नमूद केलेल्या वडाळा ट्रक टर्मिनलमध्ये भूखंडाचे वितरण करण्यासाठी प्रदान केलेले आपले अधिकार खालील शर्तींवर महानगर आयुक्तांकडे सोपवीत आहे :-

१] विशिष्ट भूखंडाच्या योग्य व इष्टतम उपयोजनाबाबत परिस्थितीची निकड विचारात घेऊन महानगर आयुक्त, त्यांना योग्य वाटेल तेव्हा या भूखंडाचे वितरण करतील.

२] भूखंडाचे अंतीमत: वितरण करण्यापूर्वी प्राधिकरणाच्या अध्यक्षांची पूर्वमान्यता मिळविण्यात येईल.

३] अशा प्रकारे वितरण केलेल्या भूखंडांची माहिती प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत कार्योत्तर मंजूरीसाठी कळविण्यात येईल.

४] जर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण [जमिनीचे वितरण] विनियम,१९७७ शिथिल करणे आवश्यक आहे असे वाटले तर विशिष्ट प्रकरणात असे शिथिलीकरण का आवश्यक आहे याविषयीची परिस्थितीपुढे मांडून प्राधिकरणाची परवानगी घेण्यात येईल."

बाब क्र.१९ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण [प्रवास भत्ता] विनियम, १९७५ मध्ये सुधारणा...

प्राधिकरणाने विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य केला व पुढील ठराव मंजूर केला :

ठराव क्र. ५४१ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम,१९७४ च्या कलम ११, पोटकलम [२] व कलम ५० द्वारा प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून प्राधिकरण याद्वारे प्रस्तावित केल्याप्रमाणे, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण [प्रवास भत्ता] विनियम,१९७५ मध्ये जोडपत्रात दर्शविल्याप्रमाणे सुधारणा करण्यास मान्यता देत आहे."

बाब क्र.२० : अव्वल कारकूनाच्या पदाची श्रेणीवाढ करणे.

प्राधिकरणाने विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य केला व पुढील ठराव मंजूर केला :

ठराव क्र.५४२ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम,१९७४ च्या कलम ११ पोटकलम [२] द्वारा प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून प्राधिकरण याद्वारे प्रस्तावित केल्याप्रमाणे प्रतिनियुक्तीवरील श्री. शिर्वटकर अव्वल कारकून हे पद धारण करतील तोपर्यंत त्या पदाची वेतनश्रेणी रू.१४००-२३०० [सुधारीत] ही रू.१४००-२६०० [सुधारीत] अशी दिनांक २०-८-१९९२ पासून वाढविण्यास मंजूरी देत आहे."

बाब क्र.२१ : वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकमधील जमिनीचे घाऊक कापड बाजारासाठी वितरण.

थोडी चर्चा झाल्यानंतर, या बाबीचा आणखी विचार करण्यासाठी ती लांबणीवर टाकण्यात आली आणि व्यापाऱ्यांचे प्रतिनिधी व इतर संबंधीत संस्था यांच्या बरोबर या बाबीवर चर्चा करावी अशी प्राधिकरणाच्या अध्यक्षांना विनंती करण्यात आली.

[कृ. मा. प.]

अध्यक्षांच्या परवानगीने पुढील बाब पटल बाब म्हणून चर्चेसाठी घ्यावी असे मान्य करण्यात आले :-

पटल बाब : वडाळा भारवाहक तळ टप्पा-१ मध्ये आयडल ट्रक पार्कींगसाठी भूखंड हे भूखंड परिवहन आयुक्त मुंबई गुडस ट्रान्सपोर्ट असोसिएशन आणि महाराष्ट्र राज्य ट्रक, टेम्पो, टॅंकर्स, बस वाहतूक महासंघ यांच्याकरिता राखून ठेवणे - पार्कींगसाठी खर्च देणे.

बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करून प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ५४३ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ च्या पोटकलम [२] अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व शक्तींचा वापर करून प्राधिकरण याद्वारे, ट्रक टर्मिनलच्या टप्पा-१ मध्ये आयडल पार्कींगसाठी राखून ठेवलेली जागा परिवहन आयुक्त, मुंबई गुडस् ट्रान्सपोर्ट असोसिएशन आणि महासंघ यांना त्यांच्या आवश्यकतेच्या आधारे महानगर आयुक्त ठरवतील त्या प्रमाणात नेमून देण्यास मान्यता देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, परिवहन आयुक्त यांना आकारावयाचे भाडे मुं.म.प्र.वि.प्रा.च्या अध्यक्षांची मान्यता घेऊन महानगर आयुक्त निश्चित करतील आणि मुंबई गुडस् ट्रान्सपोर्ट असोसिएशन व महासंघ यांना नेमून द्यावयाच्या जागेवर वाहने ठेवण्याची फी वेळोवेळी महानगर आयुक्तांकडून ठरवली जाईल.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण [जमिनीचे वितरण] विनियम, १९७७ च्या नमुना "डी" व "इ" मध्ये, आवश्यक फेरबदलांसह परिवहन आयुक्तांशी करावयाचे करारपत्र तयार करून ते निष्पादीत करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, मुंबई गुडस ट्रान्सपोर्ट असोसिएशन व महासंघ यांच्या सदस्यांकडून ठेवण्यात येणाऱ्या वाहनांची आवक-जावक विनियमित करण्यासाठी आणि फी वसूल करण्यासाठी लागणारा, आवश्यक तो कर्मचारीवर्ग नेमण्यास आणि खर्च करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत

[कृ.मा.प.].

...१३/-

करण्यात येत आहे."

त्यानंतर अध्यक्षांचे आभार मानून सभेचे कामकाज समाप्त झाले.

---

# MINUTES OF THE 66TH MEETING OF THE BOMBAY METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

DATE : 1st October, 1992.(Thuesday)

TIME : 11.00 A.M.

PLACE : Committee Room (Room No.313) in the Office of the Hon'ble Minister for Urban Development, Mantralaya.

MEMBERS PRESENT :

Shri Vasant Chavan, Minister for Urban Development. - Chairman

Prof.Javed Khan, Minister for Housing. - Member

Shri R.T. Kadam, Chairman, Standing Committee, Bombay Municipal Corporation. - Member

Shri Subhash Mayekar, Councillor, Bombay Municipal Corporation. - Member

Shri Chandrakant V. Gosalia, M.L.A. - Member

Shri Prabhakar N. Dharkar, M.L.C. - Member

Shri D.T. Joseph, Secretary (I) to the Government, Urban Development Department. - Member

Shri Navin Kumar, Secretary to Government, Housing & Special Assistance Department. - Member

Shri R.C. Sinha, Managing Director, CIDCO. - Member

Shri P. Subrahmanyam, Metropolitan Commissioner. - Member-Secretary

ITEM NO. 1 : Confirmation of the minutes of the last (65th) meeting of the Authority.

The minutes were confirmed.

ITEM NO. 2 : Action taken on the minutes of the last (65th) meeting of the Authority.

2.1. The question of entering into tripartite agreement between the Government in Urban Development Department, BMRDA and the land-holders, M/s. Mukand Iron & Steel Works Ltd. (since renamed as Mukand Ltd.) was again discussed. It was noted that the Committee of Secretaries on Urban Land Ceiling

had ....

had, after taking into consideration the submissions of the Urban Development Department as well as the Housing Department, had decided to enter into the proposed tripartite agreement on the conditions made applicable in similar tripartite agreement in respect of the lands held by Sharma-Varma family at the same place (at Powai). It was ultimately decided that the question be again brought forward before the next meeting of the Authority and the Authority should reconsider and take a final decision in the matter without waiting for the report of the Study Group appointed at the last (65th) meeting of the Authority held on 11th August, 1992.

2.2. As regards the agreement to be entered into by the BMRDA with the Maharashtra Nature Park Society (Item No.4 of the 65th meeting of the Authority), the Authority agreed to accept the modifications in para.2 of the draft agreement as suggested by the Maharashtra Nature Park Society (MNPS).

The action taken report was then noted by the Authority.

ITEM NO. 3 : Allotment of land in 'GN' Block to the Municipal Corporation of Greater Bombay for constructing public latrines for the residents of Bharat Nagar and Valmiki Nagar hutments.

3.1. During the course of discussion on this Item, it was suggested that the BMRDA may get constructed Sulabh type of public latrines on the land under reference and if necessary make available upto 300 Sq. Mtrs. of land for the purpose. The latrines so constructed shall then be handed over by the BMRDA to the Municipal Corporation of Greater Bombay (MCGB) for maintenance purpose on the lines MCGB maintains such public latrins at other hutments. This suggestion was accepted and the following Resolution was then passed :-

RESOLUTION NO.530 :

"RESOLVED THAT (i) in exercise of the powers conferred under sub-section (2) of Section 3 of the BMRDA Act, 1974 and all other powers enabling it in this behalf the Authority hereby authorises the Metropolitan Commissioner to allot land admeasuring upto 300 Sq. Mtrs. in 'GN' Block of Bandra-Kurla Complex to the Municipal Corporation of

Greater .....

129



Greater Bombay on 80 years lease, on a nominal rental of Re.1/- per year, after constructing Sulabh type of public latrines thereon for males and females and (ii) the Authority also authorises the Metropolitan Commissioner to make the required expenditure from the BMRDA funds for construction of the public latrines referred to above.

"RESOLVED FURTHER THAT the Lands Officer, BMRDA be and is hereby authorised to execute agreement in Form 'D' and Form 'E' in this behalf with the representative of the Municipal Corporation of Greater Bombay with necessary modifications as proposed."

ITEM NO. 4 : Allotment of land to Infrastructure Leasing & Financial Services Ltd. (IL&FS) in 'G' Block of the Bandra-Kurla Complex - Mode of payment of premium.

There was discussion on this proposal, at the end of which it was decided that the Infrastructure Leasing & Financial Services Ltd. (IL&FS) be given facility in payment of lease premium as mentioned below :-

(a) First 40% of the lease premium amount within one month from the date of acceptance of offer;
(b) further 35% of the total lease premium amount within 6 months from the date of acceptance of the offer; and
(c) the remaining 25% of the total lease premium amount within 6 months from the date of payment as mentioned in (b) above.

The Authority, accordingly, passed the following Resolution :-

RESOLUTION NO.531 :

"RESOLVED THAT in exercise of the powers conferred on it under sub-section (2) of Section 3 of the BMRDA Act, 1974, and in relaxation of Regulation No.9 of the BMRDA (Disposal of Lands) Regulations, 1977, and all other powers enabling it in this behalf, and in modification of Resolution No.507 passed in its 63rd Meeting held on 21st April, 1992, the Authority hereby allows the Infrastructure Leasing and Financial Services Ltd. (IL&FS) to pay the lease premium of Rs.42 crores in the manner as mentioned below :-

(a) First 40% of the lease premium amount within one month from the date of acceptance of offer;

(b) further....

(b) further 35% of the total lease premium amount within 6 months from the date of acceptance of offer; and

(c) the remaining 25% of the total lease premium amount within 6 months from the date of payment as mentioned in (b) above.

"RESOLVED FURTHER THAT the Metropolitan Commissioner be and is hereby authorised to make necessary changes in the Agreement to lease in Form 'D' and Lease Deed in Form 'E', as proposed."

ITEM NO. 5 : Allotment of land admeasuring 5000 Sq. Mtrs. in 'G' Block of Bandra Kurla Complex to the Association of the Chartered Accountants for constructing office building.

Consideration of this Item was deferred.

ITEM NO. 6 : Annual Report of the BMRDA as the Special Planning Authority for Bandra-Kurla Complex Notified Area for the year 1991-92.

During the course of discussion on this Item, it was suggested that the details of channelisation of Mithi River and Vakola Nalla with its status report be brought as a separate Item for the consideration of the Authority. This was agreed to. The Authority then passed the following Resolution :-

RESOLUTION NO.532 :

"RESOLVED THAT the Authority hereby (i) approves the draft of the Annual Report for the year 1991-92 of the BMRDA as the Special Planning Authority for Bandra-Kurla Complex Notified Area, as required under Section 133 of the MR&TP Act, 1966, and (ii) authorises the Metropolitan Commissioner to submit the same to the State Government."

ITEM NO. 7 : Annual Report of the BMRDA as the Special Planning Authority for Kalyan Complex Notified Area for the year 1991-92.

The Authority approved the draft annual report and passed the following Resolution :-

RESOLUTION NO.533 :

"RESOLVED THAT the Authority hereby (i) approves the draft report of the BMRDA as the Special Planning Authority

for....

for Kalyan Complex Notified Area for the year 1991-92; and (ii) authorises the Metropolitan Commissioner to submit the same to the State Government."

ITEM NO. 8 : Annual Report of the BMRDA as the Special Planning Authority for Backbay Reclamation Scheme (Blocks III to VI) for the year 1991-92.

The Authority approved the draft annual report and passed the following Resolution :-

RESOLUTION NO.534 :

"RESOLVED THAT the Authority hereby (i) approves the draft report of the BMRDA as the Special Planning Authority for Blocks III to VI of Backbay Reclamation Scheme for the year 1991-92 and (ii) authorises the Metropolitan Commissioner to submit the same to the State Government."

ITEM NO. 9 : Annual Report of the BMRDA as the Special Planning Authority for Oshiware District Centre Area for the year 1991-92.

The Authority approved the draft annual report and passed the following Resolution :-

RESOLUTION NO.535 :

"RESOLVED THAT the Authority hereby (i) approves the draft Annual Report of the BMRDA as the Special Planning Authority for Oshiware District Centre for the year 1991-92 and (ii) authorises the Metropolitan Commissioner to submit the same to the State Government."

ITEM NO.10 : Shifting of Wholesale Iron & Steel Market to Kalamboli, New Bombay - Difficulties encountered.

During the course of discussion on this Item, it was noted that the reasonable facilities required are made available but due to delay on the part of majority of traders to shift, it has become very difficult to maintain and continue these facilities. It was also noted that few traders who have already shifted are also finding very difficult to continue at Kalamboli. The Managing Director, CIDCO made it clear that once the traders are shifted to Kalamboli, their problems, etc. would be looked into by periodical meetings.

It was then decided that the traders be given final notices to shift by 1st December, 1992.

ITEM NO.11 : Allotment of land in 'G' & 'GN' Blocks in Bandra-Kurla Complex - Procedure for allotment of - Determination of lease premium.

After discussion, it was decided that only 2 residential plots in 'GN' Block of Bandra-Kurla Complex be disposed of by inviting offers by public advertisement from Government, Semi-Government and public sector undertakings both Central and State Government.

ITEM NO.12 : Grant of additional FSI 0.5 for proposed hospital building bearing CTS No.A-791 of Bandra Reclamation, Bandra (West), 'A' Block, Bandra-Kurla Complex for Leelavati Kirtilal Mehta Medical Trust.

Government directive under Section 154 of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 to make available additional F.S.I. of 0.5 over the existing F.S.I. of 2.5 for the extension of hospital building of Leelavati Kirtilal Mehta Medical Trust on land bearing CTS No.A-791 of Bandra Reclamation, Bandra (West), in 'A' Block of Bandra-Kurla Complex was considered by the Authority and the Authority decided to grant additional F.S.I. of 0.5 over and above the normal F.S.I. of 1.5 and the additional F.S.I. 1.0 already sanctioned by the State Government to M/s. Leelavati Kirtilal Mehta Medical Trust for their hospital.

ITEM NO.13 : Creation of 6 posts of Apprentices (Graduate/Diploma Holder) in Civil Engineering under the Apprentices (Amendment) Act, 1973.

The Authority approved the proposal contained in the Item Note and passed the following Resolution :-

RESOLUTION NO.536 :

"RESOLVED THAT in exercise of the powers conferred under sub-section (2) of Section 11 of the BMRDA Act, 1974 and all other powers enabling it in this behalf the Authority, subject to approval of Government of Maharashtra, hereby accords its sanction to create six posts of

Apprentices....

Apprentices (Graduate/Diploma Holders) in Civil Engineering on the establishment of Engineering Division, BMRDA at a fixed rate of stipend as may be determined by the Government from time to time, as proposed."

ITEM NO.14 : Creation of one post of Assistant Legal Adviser in the pay scale of Rs.3000-4500 (revised) in BMRDA.

The Authority while approving the proposal viz. creation of one post of Assistant Legal Adviser suggested that minimum experience in case of appointment to the said post by nomination may be prescribed as 5 years instead of 10 years as proposed in the Annexure to the Item Note and passed the following Resolution :-

RESOLUTION NO.537 :

"RESOLVED THAT in exercise of the powers conferred under Section 11(2) of the BMRDA Act, 1974, and all other powers enabling it in this behalf, the Authority hereby accords its sanction to create one post of Assistant Legal Adviser in the pay scale of Rs.3000-4500 (revised) on the establishment of the Administration Division of the BMRDA for attending to the legal work, subject to the approval of the State Government thereto, as proposed."

ITEM NO.15 : Decisions taken by the Metropolitan Commissioner regarding disposal of built-up space in the four buildings being constructed by the BMRDA - Report.

The decisions taken by the Metropolitan Commissioner regarding disposal of surplus built-up space in four buildings being constructed by the BMRDA at Truck Terminal at Wadala which were approved by the Chairman of the Authority as per the delegation of powers made under the Authority's Resolution No.524, dated 11th August, 1992, were noted by the Authority.

ITEM NO.16 : Disposal of land for receiving station and sub-stations in 'G' Block of Bandra-Kurla Complex and in Wadala Truck Terminal Project - Delegation of powers to the Metropolitan Commissioner.

The Authority approved the proposal contained in the

Item ....

Item Note and passed the following Resolution :-

RESOLUTION NO.538 :

"RESOLVED THAT in exercise of the powers conferred under sub-section (2) of Section 3 of the BMRDA Act, 1974 and in relaxation of Regulation 4 of the said Regulations the Authority hereby delegates its power to dispose of land to the Metropolitan Commissioner, subject to the following conditions :-

(1) This power shall be exercised by the Metropolitan Commissioner in making allotment of the Authority's land to the BEST, BSES and TATA Electric Supply Co. for receiving stations and sub-stations and for erecting towers only at such rates the Metropolitan Commissioner deems fit, subject to the previous approval of the Chairman of the Authority thereto; and

(2) Such decisions taken shall be put up before the Authority for its post facto sanction in the subsequent meeting.

ITEM NO.17 : Disposal of 2 plots earmarked for Petrol and Diesel Pump and Service Station in Phase-I of Wadala Truck Terminal.

The Authority approved the proposal contained in the Item Note and passed the following Resolution :-

RESOLUTION NO.539 :

"RESOLVED THAT in exercise of the powers conferred under sub-section 2 of Section 3 of the Bombay Metropolitan Region Development Authority Act, 1974, read with Regulation 4(iii) of the BMRDA (Disposal of Lands) Regulations, 1977 hereby accords approval to offer the plot admeasuring 1147 Sq. Mtrs. with permissible built-up area of 350 Sq. Mtr. to the Indian Oil Corporation (IOC) at the lease premium of Rs.5,000/- (Rupees Five thousand only) per Sq. Mtr. of buildable area, subject to the following terms and conditions :-

(1) That the IOC shall pay half of the amount of lease premium within one month from the date of acceptance of the offer and the balance within 3 months thereafter as mentioned in Regulation 9 of the BMRDA (Disposal of Lands) Regulations, 1977;

(2) That .....

(2) That the lease rent is subject to revision after every 10 years depending upon rate that will be charged by the Authority for the plot; and

(3) That the lease period shall be 30 years.

"RESOLVED FURTHER THAT the Authority hereby approves in principle to allot a plot admeasuring 1480 Sq. Mtrs. with buildable area of 350 Sq. Mtrs. in Phase-I, earmarked for Petrol-Diesel Pump and Service Station to the Indo-Burma Petroleum Co. Ltd. (IBP) on the same terms and conditions on which the plot admeasuring 1147 Sq. Mtrs. is offered to the Indian Oil Corporation Ltd. and also authorises the Metropolitan Commissioner to offer the said plot to IBP as and when the clear orders of the Government in R&FD about the land in C.S.No.7 Wadala will be issued and after obtaining approval of the Chairman of the Authority thereto, as proposed.

"RESOLVED FURTHER THAT the Metropolitan Commissioner be authorised to implement this Resolution and make necessary modifications in the form of the Agreement to lease 'Form D' and the Lease Deed 'Form E'."

<u>ITEM NO.18</u> : Disposal of plots earmarked for Dhaba and Dormitory - Workshop and Spare Parts and Weighbridge, truck washing space, etc. - power to be delegated <u>to the Metropolitan Commissioner.</u>

The Authority approved the proposal contained in the Item Note and passed the following Resolution :-

<u>RESOLUTION NO.540</u> :

"RESOLVED THAT in exercise of the powers conferred under sub-section (2) of Section 3 of the BMRDA Act, 1974, and all other powers enabling it in this behalf, the Authority hereby delegates its powers, conferred on it, by the Regulation No.3 & 4 of the BMRDA (Disposal of Lands) Regulations, 1977 to dispose of plots in Wadala Truck Terminal mentioned in para.2 of the Item Note to the Metropolitan Commissioner subject to the below mentioned conditions :-

(1) That the Metropolitan Commissioner shall dispose of these plots as and when he deems fit considering the exigencies of the circumstances in respect of proper and optimum utilisation of a particular plot.

(2) That prior approval of the Chairman of the Authority shall be obtained before plots are finally disposed of.

(3) That the plots so disposed of shall be reported at the next meeting of the Authority for its post facto sanction.

(4) That if any relaxation of the BMRDA (Disposal of Lands) Regulations, 1977 is felt necessary, the permission of the Authority shall be taken bringing out the circumstances why relaxation is necessary in a particular case."

**ITEM NO.19 :** Amendment to B.M.R.D.A. (Travelling Allowance) Regulations, 1975.

The Authority approved the proposal contained in the Item Note and passed the following Resolution :-

**RESOLUTION NO.541 :**

"RESOLVED THAT in exercise of the powers conferred under sub-section (2) of Section 11 read with Section 50 of the BMRDA Act, 1974, the Authority hereby approves the amendments to the BMRDA (Travelling Allowance) Regulations, 1975 as shown in the Annexure, to the Item Note, as proposed."

**ITEM NO.20 :** Upgradation of the post of a Awal Karkoon.

The Authority approved the proposal contained in the Item Note and passed the following Resolution :-

**RESOLUTION NO.542 :**

"RESOLVED THAT in exercise of the powers conferred under sub-section (2) of Section 11 of the BMRDA Act, 1974, the Authority hereby accords its sanction to the post of Awal Karkoon being upgraded from Rs.1400-2300 (revised) to Rs.1400-2600 (revised) with effect from 20.08.1992 till such time as the post is held by Shri Shirwatkar, on deputation, as proposed."

**ITEM NO.21 :** Allotment of land for Wholesale Textile Market in 'G' Block of Bandra-Kurla Complex. (Deferred Item)

After some discussion, further consideration of the Item was deferred and the Chairman of the Authority was requested to discuss the matter with the representatives of traders and other concerned agencies.

With .....

With the permission of the Chair the following Item was agreed to be taken as Table Item :-

TABLE ITEM : Plots for Idle Truck Parking in Phase-I of Wadala Truck Terminal - Earmarking of these plots for the Transport Commissioner, Bombay Goods Transport Association and the Maharashtra Rajya Truck, Tempo, Tankers, Bus Vahatuk Mahasangh - Payment of charges for parking.

The Authority approved the proposal contained in the Item Note and passed the following Resolution :-

RESOLUTION NO.543 :

"RESOLVED THAT in exercise of the powers conferred on it under sub-section (2) of Section 3 of the BMRDA Act, 1974, and all other powers enabling it in this behalf, the Authority hereby approves the proposal to allot space earmarked for Idle Parking lots in the Phase-I of Truck Terminal to the Transport Commissioner, BGTA and Mahasangh in the proportion as may be decided by the Metropolitan Commissioner based on their respective requirement.

"RESOLVED FURTHER THAT the rent to be charged for the Transport Commissioner will be decided by the Metropolitan Commissioner with the approval of the Chairman, BMRDA and the fees for parking of vehicles for the space allotted to the BGTA and the Mahasangh will be decided from time to time by the Metropolitan Commissioner.

"RESOLVED FURTHER THAT the Metropolitan Commissioner be and is hereby authorised to prepare and execute necessary agreement with the Transport Commissioner in Form 'D' and 'E' of the BMRDA (Disposal of Lands) Regulations, 1977 with necessary modifications.

"RESOLVED FURTHER THAT the Metropolitan Commissioner be and is hereby authorised to appoint necessary staff, and to incur expenditure for recovering fees and regulate the movement of vehicles that will be parked by the members of the BGTA and Mahasangh."

The meeting then terminated with a vote of thanks to the Chair.

-.-.-.-.-.-